आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३० वाजता

१६ सप्टेंबर २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- २५ हजार रुपयापेक्षा कमी वेतन असणाऱ्यांना PF खातं बंधनकारक करण्याचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय

- युपीआय व्यवहारांवरचं शुल्क कायम ठेवण्यावर सरकार ठाम, परदेशी दबावातून शुल्क लादल्याचा आरोप फेटाळला

- लोकसंख्या नियंत्रणाचे उपक्रम आणि संतती नियमनासाठी दिलं जाणारं प्रोत्साहन बंद करण्याची प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेची शिफारस

**आणि**

- चित्रपट सृष्टीतला सर्वोच्च मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना जाहीर

**<><><><><>**

२५ हजार रुपयांपेक्षा कमी वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पीएफ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाहनिधीत पैसे जमा करणं केंद्र सरकारनं बंधनकारक केलं आहे. यापूर्वी १५ हजार रुपयांपेक्षा कमी वेतन असणाऱ्यांसाठी हे बंधन होतं. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आजच्या बैठकीत हा निर्णय झाल्याचं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**होल्ड - वैष्णव बाइट**

जवळपास १२ वर्षांनी केंद्र सरकारनं ही किमान वेतनाची मर्यादा वाढवली आहे. त्यामुळं ५१ लाख कर्मचाऱ्यांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेचे विविध लाभ मिळणार आहे. याअंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून १२ टक्के रक्कम पीएफ खात्यात जमा केली जाईल. तितकीच रक्कम त्यांच्या नियोक्त्याला त्या खात्यात भरावी लागेल.

**<><><><><>**

मोठ्या व्यापाऱ्यांना २ हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या युपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा निर्णय मागे घेणार नसल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. युपीआयची यंत्रणा मजबूत करण्यासाठी, त्याची सुरक्षा कायम राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं वरिष्ठ केंद्रीय अधिकाऱ्यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना स्पष्ट केलं.

अमेरिकेच्या दबावाखाली हा निर्णय घेतल्याचा दावा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला होता. केंद्रीय अर्थमंत्रालयानं हा दावा फेटाळून लावला आहे. देशातली युपीआय यंत्रणा सक्षम, स्वयंपूर्ण करण्यासाठी भारतानं स्वतंत्रपणे हा निर्णय घेतल्याचं केंद्रीय अर्थमंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

लोकसंख्या नियंत्रणासाठी केले जाणारे प्रयत्न बंद करावे, संतती नियमनासाठी दिले जाणारे प्रोत्साहन अनुदान बंद करावे, २ पेक्षा अधिक अपत्य असणाऱ्यांना अपात्र ठरवण्याची कारवाई बंद करावी अशी शिफारस प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेनं केली आहे**.** 'The Ghost of Population Past: How Population Control Persists in India' हा अहवाल परिषदेनं प्रसिद्ध केला आहे.

**<><><><><>**

ॲप आधारित कॅब आणि टॅक्सी कंपन्यांनी राईड बुकिंगपूर्वी चालकाला आगाऊ टिप देण्याचा पर्याय थांबवण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. ही पद्धत दिशाभूल करणारी तसंच अन्यायकारक असल्याचं ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे यांनी आज सांगितलं. जोपर्यंत ग्राहक टिप देत नाही, तोपर्यंत राईड उपलब्ध करून दिली जात नसल्याच्या तक्रारी प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर हे आदेश जारी करण्यात आले आहेत. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने

चालकांसाठी आगाऊ टिप देण्यासह विविध अन्यायकारक व्यावसायिक पद्धतींसाठी रॅपिडोवर १० लाखांचा दंड ठोठावल्याच्या पार्श्वभूमीवर आज हे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

सोन्याच्या दागिन्यांच्या हॉलमार्किंगचं शुल्क BIS अर्थात ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डनं वाढवलं आहे. सोन्याच्या दागिण्यांसाठी आता ४५ ऐवजी ७५ रुपये शुल्क द्यावे लागेल. तत्काळ हे दर लागू झाले आहेत. चांदीच्या दागिन्यांसाठी पूर्वीप्रमाणे ३५ रुपये शुल्क द्यावं लागेल.

**<><><><><>**

'स्वच्छता ही सेवा २०२६' मोहिमेचा प्रारंभ आज केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी केला. 'स्वच्छतेत सहभाग; स्वच्छ भारत, विकसित भारत' ही या मोहिमेची संकल्पना आहे. या अंतर्गत सार्वजनिक स्थळांचं परिवर्तन, स्वच्छ शाळा, सफाईमित्र सुरक्षा आणि सन्मान शिबिर, स्वच्छतेसाठी 'जन-भागीदारी' आणि 'स्वच्छतेतून समृद्धी' असे उपक्रम राबवले जाणार आहेत. १ ऑक्टोबर रोजी 'एक दिन, एक घंटा आणि एक साथ' या उपक्रमांतर्गत देशभरात एकाच वेळी स्वयंस्फूर्तीनं श्रमदान आणि स्वच्छता मोहिमा राबवल्या जातील.

**<><><><><>**

भारतीय चित्रपट सृष्टीतला सर्वोच्च मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना जाहीर झाला आहे. प्रदीर्घ आणि समृद्ध अभिनय कारकीर्दीत भारतीय चित्रपट सृष्टीला दिलेल्या योगदानाबद्दल २०२४ च्या फाळके पुरस्कारासाठी निवड समितानं त्यांच्या नावाची शिफारस केली होती. येत्या २२ तारखेला गुजरातमधे केवडिया इथं होणाऱ्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

कोकणी भाषक कुटुंबात जन्माला आलेल्या अनंत नाग यांनी हिंदी, मराठी, इंग्रजीसह विविध भाषांमधल्या २५० पेक्षा जास्त चित्रपटांमधून काम केलं. यात

मोठी संख्या कन्नड चित्रपटांची आहे. त्यासाठी कन्नड चित्रपट सृष्टीचे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. हिंदीमध्ये अंकुर, निशांत, मंथन, कोंडुरा, गहराई, कलयुग, युवा, इंग्रजीमध्ये स्टंबल, तर मराठीमध्ये अनाहत इत्यादी चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका केल्या.

त्यांना फाळके पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनंत नाग यांच अभिनंदन केलं आहे. त्यांचा सहजसुंदर अभिनय, त्यातलं वैविध्य, आणि गुणवत्ता यामुळे भारतीय चित्रपट सृष्टीवर त्यांनी आपला खोल ठसा उमटवला आहे. त्यांच्यासारख्या कलाकाराला हा सन्मान मिळाल्याचा आनंद होतोय, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

तीन लाख रुपयेपेक्षा कमी मूल्याच्या निर्यातीसाठी आरसीएमसी म्हणजे नोंदणी - तथा सदस्यता प्रमाणपत्र सादर करण्याची अट सरकारने शिथिल केली आहे. छोट्या निर्यातदारांना प्रोत्साहन देण्यासाठी तसंच टपाल किंवा कुरियर द्वारे निर्यातीवरचा बोजा कमी करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने म्हटलं आहे.

मध्यम, लघु आणि सूक्ष्म उद्योगांना तसंच स्टार्टअप्सना या निर्णयाचा फायदा होईल.तीन लाख रुपयांच्या पुढे निर्यात गेल्यास निर्यातदारांना संबंधित निर्यात प्रोत्साहक मंडळ किंवा कमॉडिटी बोर्डाचं सदस्यत्व घेता येईल.

**<><><><><>**

शिवसेनेचं मूळ पक्षचिन्ह आणि मूळ पक्षाचं नाव कोणत्याही गटाला न देता त्यांना स्वतंत्र चिन्हावर निवडणूक लढवायला सांगण्याचा पर्याय केंद्रीय निवडणूक आयोगासमोर उपलब्ध होता. बाळासाहेबांचा वारसा न सांगता त्यांना स्वबळावर निवडणूक लढवायला सांगायला हवी होती, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयातले न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी आज नोंदवल.

सरन्यायधिश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांच्या पीठापुढं एकनाथ शिंदे यांच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ निरज कौल यांनी आज युक्तीवाद पुढं सुरू केला. बहुमत असलेल्या आमदारांवर अपात्रतेची प्रक्रिया प्रलंबित असतांना राजकीय पक्षाची मालकी निश्चित करण्यासाठी विधिमंडळातलं बहुमत ही सुरक्षित चाचणी मानता येईल का? असा सवाल सर्वोच्च न्यायालयानं आज एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या पक्षाला केला. राष्ट्रीय पक्षात बहुमताचं महत्त्व यापूर्वी सर्वोच्च न्यायालयानं अधोरेखित केलं असून याबाबतीत निवडणूक आयोगानं ते तत्त्व लागू केलं आहे, असं ते म्हणाले. बहुमताच्या वेगवेगळ्या चाचण्यांना मर्यादा आहेत, असं त्यांनी सांगितलं. त्यावर जर या चाचण्यांना मर्यादा असतील तर वेगळा पर्याय उपलब्ध आहे असं न्यायमूर्ती बागची म्हणाले.

**//<><><><><>//**